RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ६, अंक १४] बुधवार, फेब्रुवारी १२, २०२०/माघ २३, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
**शहर विकास विभाग**

**जाहीर सूचना**

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये )

क्र. ठामपा/मुख्या.१/शविवि-२९/वियोअंक/२६६०

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस/१२९७/१३१९/सी.आर-१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर १९९९ अन्वये मंजूर असून, २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेल्या क्षेत्राची (Excluded portion) विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस/१२०१/२७४/सीआर-२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ अन्वये मंजूर झाली असून दिनांक १४ मे २००३ पासून अंमलात आली आहे. (यापूढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मौजे कौसा येथील स. नं. १०१/३ व १०१/४ या भूखंडापैकी " उक्त मंजूर विकास योजनेनुसार " काही भाग (अंदाजे क्षेत्र ३४५०.०० चौ.मी.) " रहिवास विभागात " समाविष्ट होत आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर उक्त रहिवास क्षेत्राऐवजी मंजूर विकास योजनेत पाणीपुरवठा संबंधित योजनांची कामे विकसित करणेकामी " पाणीपुरवठा योजनाकरिता आरक्षित भूखंड " असे आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. त्याकरिता उक्त भूखंड पाणीपुरवठा योजनाकरिता आरक्षित ठेवण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे आवश्यक आहे. (यापुढे " उक्त फेरबदल " असे संबोधिले आहे) व अशा फेरबदलाची कार्यवाही करणेस मा. महासभा ठराव क्र. १६५, दिनांक ११ नोव्हेंबर २०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार " उक्त मंजुर विकास योजनेत " " उक्त फेरबदलाबाबत " आम जनतेच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी ही जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक नगररचना, ठाणे महानगरपालिका, " महापालिका भवन ", सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सूचना फलकावर व खाली नमूद केलेल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सूचना/हरकती घ्यावयाची असल्यास त्यांनी ही सूचना वृत्तपत्रात व *www.thanecity.gov.in* या संकेतस्थळावर आणि **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत आपली सूचना/हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे सादर करावी.

**श्रीकांत देशमुख,**
सहायक संचालक नगर रचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे,
दिनांक : १२ फेब्रुवारी २०२०.

**THANE MUNICIPAL CORPORATION, THANE**

**Town Planning Department**

**Notice**

(U/s. 37 of Maharashtra Regional and Town Planning Act,1966)

No. TMC Hq.1/ TDD-29/ DPIC/2660

Whereas, the Revised Development Plan of the city of Thane has been Sanctioned by Government *vide* Notification No. TPS/1297/1319/CR-148/97/UD-12, Dated 4th October 1999 and came into force from 22nd November 1999. Also the Development Plan for Excluded portion (EP) from Revised Development plan was sanctioned *vide* Government's Notification No. TPS/1201/274/CR-28/2009/UD-12, Dated 3rd April 2003 and and came into force from 14th May 2003 (Herein after referred to as "The said Sanctioned Development Plan") ;

And Whereas, portion of land bearing S.No. 101/3 and 101/4 at Mouje Kausa (approx. area 3450.00 sq.mtrs.) is included in residential zone as per " The said Sanctioned Development Plan " ;

And Whereas, it is necessary to Reserved the said land for " Reservation for Water Supply Scheme " in " The said Sanctioned Development Plan " for development of water supply related work on this land. Hence, it is proposed to modify the said existing residential zone as " Reservation for Water Supply Scheme " as per provision under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 in Sanctioned Development Plan (herein after referred as the " said modification "). And The Hon. General Body of Thane Municipal Corporation *vide* its Resolution No. 165, dated 11th November 2019 has accorded sanction for the above said procedure of modification ;

And therefore, this notice is published for inviting suggestions/objections from the public to carry out " The said Modification in The said Sanctioned Development Plan " as per the provisions under section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. The Plan showing " The said modification " is displayed on the notice board in the office of Assistant Director Town Planning, Town Development Department, Thane Municipal Corporation, " Mahapalika Bhavan ", Sarsenani General Arunkumar Vaidy Marg, Chandanvadi, Panchpakhadi, Thane and also published on web site mentioned below. Any person who wants to submit suggestion may submit his suggestion or objection to the said modification within 30 (Thirty) days from the publication of this notice in the news paper, on the website *www.thanecity.gov.in* and *Maharashtra Government Gazette*, to the Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

SHRIKANT M. DESHMUKH,
Asst. Director Town Planning,
Thane Municipal Corporation, Thane.

Thane,
dated the 12th February 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.